# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 26 November 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.**

****

आपल्या देशाचं संविधान लोकशाहीचा आधारस्तंभ आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. संविधानात देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचं प्रतिबिंब आहे. राज्यघटनेतील न्याय, समता, स्वतंत्रता, बंधुता हे आदर्श शतकांपासून भारताला प्रेरक आहेत, असं त्या म्हणाल्या. भारतीय संविधान स्वीकारल्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ‘हमारा संविधान हमारा स्वाभिमान’ या वर्षभर चालणाऱ्या ऐतिहासिक उत्सवाचं आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अध्यक्षतेखाली संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात उद्घाटन झालं, त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. संविधान सदनाच्या ऐतिहासिक मध्यवर्ती सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला उपराष्ट्रपती जगदीप धनकड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला उपस्थित होते. राष्ट्रपतींच्या मार्गदर्शनाखाली संविधानाच्या उद्देशिकेचं वाचन यावेळी करण्यात आलं.

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संविधानाच्या उद्देशिकेचं वाचन**

याच कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते संविधान स्वीकारल्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विशेष नाणं आणि टपाल तिकिटाचं प्रकाशन करण्यात आलं. तसंच ‘मेकिंग ऑफ द कॉन्स्टिट्युशन ऑफ इंडिया: ए ग्लिंप्स’ आणि ‘मेकिंग ऑफ द कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया अँड इट्स ग्लोरियस जर्नी’ या पुस्तकांचं प्रकाशन, संविधानाच्या नैपुण्य आविष्काराला समर्पित पुस्तिका तसंच संस्कृत आणि मैथिली भाषेतील संविधानाचं प्रकाशनही आजच्या कार्यक्रमात करण्यात आलं.

****

भारतीय संविधान दिनानिमित्त मुंबई इथं मंत्रालयात झालेल्या कार्यक्रमात काळजीवाहू उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचं वाचन केलं. यावेळी संजय बनसोडे, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची उपस्थिती होती.

****

नागपूर इथं विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते आकाशात फुगे सोडून 'हर घर संविधान' कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. वाशीम इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात संविधान उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं. यानंतर माजी सैनिकांनी बिगुल वाजवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सामूहिक मानवंदना दिली. जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस यांच्या हस्ते संविधान सन्मान रॅलीला हिरवा झेंडा दाखवण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर इथंही क्रांती चौकातून भारतीय संविधान, सन्मान, सुरक्षा, संवर्धन समितीतर्फे रॅली काढण्यात आली.

****

मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात हौतात्म्य प्राप्त जवानांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आदरांजली अर्पण केली. देशवासियांचं रक्षण करताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सुरक्षा जवानांना देशाचा सलाम, असं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

****

मुंबईत झालेल्या कार्यक्रमात राज्यपाल सी पी राधाकृष्णन, काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी मुंबई दहशतवादी हल्ल्यातील हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली.

****

१४ व्या विधानसभेचा कार्यकाल आज संपत असल्यानं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्याकडं मुख्यमंत्री पदाचा राजीनामा सुपूर्द केला. १४ वी विधानसभा विसर्जित होत असल्यानं आता नवनिर्वाचित आमदारांची १५ वी विधानसभा गठित करण्याची आणि नव्या सरकारच्या स्थापनेची प्रक्रिया सुरू होईल. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत एकनाथ शिंदे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कामकाज पाहतील, अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली.

****

राज्याच्या पोलीस महासंचालकपदी रश्मी शुक्ला यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. गृहविभागानं काल या संदर्भातला आदेश जारी केला. विधानसभा

निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगाच्या निर्देशामुळे निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत शुक्ला यांचा पदभार संजय कुमार यांच्याकडं सोपवण्यात आला होता. या कालावधीत शुक्ला सक्तीच्या रजेवर होत्या.

****

मुंबई- लातूर आणि मुंबई- बीदर या जलदगती गाड्यांचा कायमस्वरूपी विस्तार केला जाणार आहे. या गाड्यांना ८ शयनयानासह एकूण २१ डबे जोडले जाणार आहेत. विस्तारित मुंबई–लातूर गाडी एक डिसेंबर रोजी आणि मुंबई–बीदर गाडी ४ डिसेंबरला छत्रपती शिवाजी महाराज स्थानकावरुन सुटेल तर लातूरहून मुंबईला येणारी गाडी २ डिसेंबरला लातूरहून सुटेल आणि बीदर–मुंबई गाडी ५ डिसेंबरपासून बीदर स्थानकावरुन सुटेल असं मध्य रेल्वेन प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवलं आहे.

****

ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांना मराठी नाट्य कलाकार संघातर्फे 'रंगकर्मी जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. काल मुंबईत झालेल्या जागतिक रंगकर्मी दिवस सोहळ्यात उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते मोहन जोशी यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

****